News Paper Name: Kesari (Pune Editions)

Language: Marathi

Web Link: http://www.dailykesari.com/kesarinews.aspx .

Page Number: 9

Date: 27 March 2017

केसरी पुणे, २७ मार्च २०१७ ९ संमिश्र

# देशाचा ऱ्हास होण्यास युद्ध कारणीभूत : प्रा. गार्टनर

पुणे : प्रभावशाली देश हे दुर्बल देशांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी आक्रमण करतात. यामुळे दुर्बल देश हे दहशतवाद पसरविण्याचे इंजिन बनते. युद्ध ही बाबच अशी आहे की, यामुळे संपूर्ण देशाचा ऱ्हास होतो, असे मत अमेरिकेच्या पेनिसिल्व्हिया स्टेट विद्यापीठातील स्कूल ऑफ इंटरनॅशनल अफेअर्सचे प्रा. स्कॉट सिम्मंड गार्टनर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी अँड डिफेन्स ॲनालिसिस व संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाच्या वतीने 'दहशतवाद व प्रतिदहशतवाद' विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, इंडियन काउन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चचे संचालक डॉ. उपेंद्र चौधरी, एअर मार्शल भूषण गोखले, वाय. सी. निसदाचे संचालक प्रा. डॉ. विजय खरे, संरक्षण व सामरिक शास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण दळवी, डॉ. नितीन गोखले उपस्थित होते.



'दहशतवाद व प्रतिदहशतवाद' विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना (डावीकडून) प्रा. स्कॉट रिम्मंड गार्टनर, डॉ. विजय खरे, कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, डॉ. अरुण दळवी व एअर मार्शल भूषण गोखले.

डॉ. गार्टनर म्हणाले, दहशतवादाचे मूळ कारण शोधल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राचं प्रतिदहशतवादाचं धोरण अशक्य आहे. २००३ साली अमेरिकेने इराकला सहजपणे हरवले होते. परंतु याचा परिणाम म्हणजे ते राष्ट्र विविध तुकड्यांमध्ये विभागले तर गेलेच, शिवाय ते राष्ट्र आता शस्त्रअस्त्राने सज्ज झाले आहे. यामुळे आपोआपच ते राष्ट्र दहशतवादाकडे झुकले गेले आहे.

डॉ. गाडे म्हणाले, दहशतवाद हा स्थानिक मुद्दा नसून आता तो एक आंतरराष्ट्रीय समस्येचा विषय होऊन बसला आहे. दहशतवाद का तयार झाला व त्याचे काय कारण आहे याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती कोकीळ यांनी केले, तर आभार एअर मार्शल भूषण गोखले यांनी मानले.